# छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

सत्यमेव जयते

सारथी

---

स्वत:च्या पायावर उभे राहण्याची मनिषा बाळगणाऱ्या  युवक- युवतींसाठी स्वावलंबनाची सुवर्ण संधी !!!

## सारथीचा कौशल्य विकास कार्यक्रम

# कौशल्य विकास कार्यक्रम मार्गदर्शिका

सारथी, पुणे यांच्या कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत मराठा , कुणबी , कुणबी –मराठा व मराठा -कुणबी  समाजाच्या  नॉन क्रिमीलेअर गटाच्या  युवक - युवतींसाठी  **Maharashtra Ex-Servicemen Corporation Limited (मेस्को), Pune** मार्फ़त कौशल्य  विकासाचे प्रशिक्षण  कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. सदर प्रशिक्षण कार्यक्रम, प्रवेशाकरिता आवश्यक शैक्षणिक पात्रता आणि कालावधी यांचा तपशील खालील प्रमाणे आहे,

| **अ. क्र.** | **प्रशिक्षण कार्यक्रमाचे नाव** | **किमान शैक्षणिक पात्रता** | **कालावधी** |
|---|---|---|---|
| १ | मेकॅनिकल फिटर / Mechanical Fitter | दहावी पास | ३ महिने |
| २ | सीएनसी ऑपरेटर / CNC Operator | दहावी पास | ३ महिने |

**प्रशिक्षण केंद्राचा पत्ता**

**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित (मेस्को),**

**महासैनिक ओद्योगीक इस्टेट, प्लॉट नं. T-१५३/ १,**

**भोसरी , पुणे ४११०२६**

- प्रति प्रशिक्षणार्थीसाठीचे प्रशिक्षण शुल्क सुमारे रु २०,०००/- सारथी कडून दिले जाणार आहे.
- निवासी प्रशिक्षणार्थींकरिता भोसरी, पुणे येथे निवास व भोजन व्यवस्था प्रशिक्षण संस्था (मेस्को, पुणे) मार्फ़त करण्यात येणार आहे. निवास व भोजन व्यवस्थेकरिताचा संपूर्ण खर्च सारथी, पुणे कडून केला जाणार आहे.

**प्रशिक्षण कार्यक्रमाची वैशिष्ट्ये :-**

- **महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित (मेस्को), पुणे या नामांकित संस्थेमार्फत उच्च दर्जाचे प्रशिक्षण**
- **यशस्वीरीत्या प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना उत्तम पगाराच्या नोकरीची संधी**
- **मेस्को, पुणे यांच्या भोसरी येथील प्रशिक्षण केंद्रामध्ये आधुनिक उपकरणे, साधन सामग्री यांवर अधिकाधिक प्रत्यक्ष कामाचा अनुभव (ऑन जॉब ट्रेनिंग) व सराव करण्याची संधी**
- **मेहनती व होतकरू प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण घेत असतानाच उर्वरित वेळेमध्ये जवळच्या कंपन्यांमध्ये ट्रेनी म्हणून काम करून अनुभव आणि अर्थार्जन करण्याची संधी**

# READ THE FOLLOWING GUIDELINES VERY CAREFULLY BEFORE YOU APPLY ONLINE

# ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी उमेदवारांनी खालील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.

**अर्ज करण्याची प्रक्रिया :**

१. वर नमूद केलेल्यापैकी कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्याकरिता पात्र उमेदवारांनी https://sarthi-maharashtragov.in/ > NOTICE BOARD> MESCO>APPLY ONLINE येथे क्लिक करून ऑनलाईन अर्ज करावा.

२. फक्त ऑनलाईन द्वारे केलेले अर्जच स्वीकारले जातील. प्रत्यक्ष जमा केलेले, पोस्ट, कुरिअर, ई-मेल किंवा अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

३. उमेदवार आपल्या जवळच्या ई -सेवा केंद्र , सायबर कॅफे इत्यादी ठिकाणी जाऊन ऑनलाईन अर्ज करण्यासाठी कोणाचीही मदत घेऊ शकतात.

४. ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी सर्व आवश्यक कागदपत्रे व त्यांच्या स्कॅन कॉपीज जवळ तयार ठेवाव्यात व योग्य ठिकाणी अपलोड कराव्यात.

५. ऑनलाईन अर्ज करताना खालील कागदपत्रे व त्यांच्या स्कॅन कॉपीज जवळ ठेवाव्यात योग्य ठिकाणी अपलोड कराव्यात.

१) उमेदवारचा फोटो

२) उमेदवाराची स्वाक्षरी

३) दहावी, बारावी, डिप्लोमा प्रमाणपत्रे

४) जातीचे प्रमाणपत्र

५) नॉन क्रिमी लेयरचे प्रमाणपत्र

६) जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला

७) रहिवासी दाखला (डोमिसाईल प्रमाणपत्र)

८) आधारकार्ड

९) उमेदवारांच्या स्वाक्षरीचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र

६. प्राप्त अर्जांमधून निकषाच्या आधारे छाननी करून निवडक उमेदवारांना प्रवेश चाचणी परीक्षा / मुलाखती / समुपदेशन / कल चाचणी इत्यादी साठी प्रशिक्षण संस्थेमार्फत दूरध्वनी किंवा ई - मेल द्वारे कळविण्यात येईल.

७. संबंधित उमेदवारांनी निवड कार्यक्रम स्थळी स्वखर्चाने उपस्थित राहावे.

८. प्रशिक्षण कार्यक्रम निवडण्यापूर्वी उमेदवारांनी प्रशिक्षण कार्यक्रमाविषयी मूलभूत माहिती घेऊन मगच प्रशिक्षण कार्यक्रमाची निवड करावी. याबाबतचे मार्गदर्शन व अधिक माहितीकरिता प्रशिक्षण संस्थेचा संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे आहे.

**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित (मेस्को), पुणे**

**श्री. पराग - ८२०८५९६५५९**

**प्रशिक्षण केंद्राचा पत्ता**

**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित (मेस्को),**

**महासैनिक ओद्योगीक इस्टेट, प्लॉट नं. T-१५३/ १, भोसरी , पुणे ४११०२६**

१०. प्रशिक्षण कार्यक्रम निवडण्यापूर्वी उमेदवारांनी पुढे दिलेली प्रशिक्षण विषयक माहिती काळजीपूर्वक वाचावी.

**एकच ध्यास – कौशल्य विकास**

# प्रशिक्षण कार्यक्रम बद्दलची माहिती व भविष्यातील वाटचाल

## सीएनसी ऑपरेटर (CNC OPERATOR) जॉब म्हणजे काय?

Computerized Numerical Control (सीएनसी):- आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कंप्युटराईज्ड न्युमरिकल कंट्रोल (सीएनसी) यंत्रणेचा वापर सीएनसी ऑपरेटर विविध प्रकारच्या उत्पादनांसाठी धातू व प्लास्टिकची उत्पादने बनविण्यासाठी करतात. सीएनसी ऑपरेटरकडे यंत्रावर काम करण्याचे कौशल्य असणे आवश्यक आहे तसेच सीएनसी ऑपरेटरला इंजिनीयरींग ड्रॉईंग वाचता येणेही गरजेचे असते. सीएनसी या क्षेत्रामध्ये रोजगाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून औदयोगिक क्षेत्रात  मोठ्या प्रमाणात कुशल कामगारांना मागणी आहे.

कंप्युटराईज्ड न्युमरिकल कंट्रोल (सीएनसी) ऑपरेटर आणि प्रोग्रामर्सची मुख्यत: उत्पादन कंपन्यांमध्ये अत्यंत महत्वाची भूमिका असते. सीएनसी ऑपरेटर संगणकाद्वारे प्रोग्राम केलेली मशीनरी हाताळतात व अशा मशीनरीद्वारे ड्रिलिंग, कटिंग किंवा आकार देणे यासारखी विविध कार्ये करतात.

# करियरमधील भविष्यातील संभाव्य संधी:




| अ. क्र. | करियरमधील टप्पा व त्यासाठी अंदाजित कालावधी | अंदाजित अपेक्षित पगार (प्रति महिना) |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर ऑपरेटर म्हणून नोकरीची संधी | रु. ११,०००/- ते १२,०००/- |
| २ | १ वर्ष ऑपरेटर म्हणून काम केल्यानंतर आणि आपल्या कौशल्यामध्ये अधिकाधिक सुधारणा (फ़ाईन ट्यूनिंग) केल्या नंतर फ़ेटर (Fetter) म्हणून काम करण्याची संधी | रु. १५,०००/- ते १८,०००/- |
| ३ | फ़ेटर (Fetter) म्हणून 1 वर्ष काम केल्यावर आणि त्याच्या कौशल्यामध्ये अधिकाधिक सुधारणा (फ़ाईन ट्यूनिंग) केल्या नंतर प्रोग्रामर म्हणून काम करण्याची संधी. याकरिता इंग्रजी भाषेचे ज्ञान (इंग्रजी बोलणे व लिहिणे) असणे, इंग्रजीतील तपासणी फॉर्म भरता येणे आणि Engineering Drawing वाचता येणे आवश्यक असते. | रु. १८,०००/- ते २५,०००/- |

टीप: उपरोक्त प्रमाणे नोकरीची हमी सारथी देत नसून कौशल्ययुक्त उमेदवारांना उपरोक्त प्रमाणे संधी उपलब्ध आहे याबाबतची माहिती दिली आहे. तथापि उपरोक्त प्रमाणे यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करून कौशल्ययुक्त उमेदवारांना संबंधित औद्योगिक क्षेत्रात नोकरी मिळविण्यासाठी मेस्को, पुणे कडून मार्गदर्शन करण्यात येईल व योग्य उमेदवारांना संबंधित औद्योगिक क्षेत्राशी संपर्क साधून संधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

## मेकॅनिकल फिटर (Mechanical Fitter) चा जॉब म्हणजे काय?

यंत्रसामग्री बनविणे, इन्स्टॉलेशन करणे आणि दुरुस्त करणे यासाठी मेकॅनिकल फिटरची आवश्यकता असते. मशीनिंग, मिलिंग, ड्रिलिंग, कटिंग आणि वेल्डिंग उपकरणे, पंप्स, गियर बॉक्सेस यांसारख्या अनेक साधने आणि उपकरणांचे फ़िटींग, इन्स्टॉलेशन व दुरुस्ती ही कामे मेकॅनिकल फिटर करतात. तसेच साधारणपणे खालील प्रकारची कामे ही मेकॅनिकल फिटर करतात.

1) यांत्रिकी देखरेखीची कामे जसे की पंप / कॉम्प्रेसर / टर्बाइन / सर्व प्रकारच्या यंत्रसामग्रीच्या देखभालीचे कामे

2) स्ट्रक्चर / पाईप फॅब्रिकेशनची कामे, छप्पर, इमारत आणि बांधकाम, जहाजे, ऑटोमोबाईल आणि त्यांची दुरुस्ती,

कुशल मेकॅनिकल फिटरना रेल्वे किंवा इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रातील सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील कंपन्यामध्ये चांगल्या नोकरीच्या संधी मिळू शकतात.

# करियरमधील भविष्यातील संभाव्य संधी:




<u>10 वी पास</u>

| अ. क्र. | करियरमधील टप्पा व त्यासाठी अंदाजित कालावधी | अंदाजित अपेक्षित पगार (प्रति महिना) |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर ट्रेनी टेक्निशियन म्हणून नोकरीची संधी | रु.७०००/- ते १००००/- |
| २ | १ वर्ष केल्यानंतर ट्रेनी टेक्निशियन म्हणून काम केल्यानंतर आणि आपल्या कौशल्यामध्ये अधिकाधिक सुधारणा (फ़ाईन ट्यूनिंग) केल्या नंतर टेक्निशियन म्हणून काम करण्याची संधी | रु.१०,०००/- ते १४,०००/- |
| ३ | १ वर्ष टेक्निशियन म्हणून काम केल्यावर आणि आणि त्याच्या कौशल्यामध्ये अधिकाधिक सुधारणा (फ़ाईन ट्यूनिंग) केल्या नंतर म्हणून काम करण्याची संधी. | रु.१४,०००/- ते २०,०००/- |

टीप: उपरोक्त प्रमाणे नोकरीची हमी सारथी देत नसून कौशल्ययुक्त उमेदवारांना उपरोक्त प्रमाणे संधी उपलब्ध आहे याबाबतची माहिती दिली आहे. तथापि उपरोक्त प्रमाणे यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण करून कौशल्ययुक्त उमेदवारांना संबंधित औद्योगिक क्षेत्रात नोकरी मिळविण्यासाठी मेस्को, पुणे कडून मार्गदर्शन करण्यात येईल व योग्य उमेदवारांना संबंधित औद्योगिक क्षेत्राशी संपर्क साधून संधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल.

**उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करताना अपलोड करावयाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना**

**सूचना: उमेदवाराने खालील प्रतिज्ञापत्रात नमूद नियम काळजीपूर्वक वाचून मगच त्यावर स्वाक्षरी करावी. स्वाक्षरी केलेल्या प्रतिज्ञापत्राचा नमुना ऑनलाईन अर्ज भरताना स्कॅन करून अपलोड करावा.**

१. प्रशिक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांपैकी पात्र उमेदवारांची निवड मुलाखत, कल चाचणी, परीक्षा इत्यादीच्या आधारावर केली जाईल. सदर निवड प्रक्रिया पूर्णपणे महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमेन कॉर्पोरेशन लिमिटेड (मेस्को ),पुणे मार्फत राबविली जाणार आहे.

२. संपूर्ण प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थींची १००% उपस्थिती आवश्यक आहे.

३. प्रशिक्षण संस्थेमार्फत वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या परीक्षा, चाचण्या, इत्यादीना प्रशिक्षणार्थीनी पूर्ण तयारीनिशी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

४. प्रशिक्षण संस्थेने घालून दिलेल्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यास प्रत्येक प्रशिक्षणार्थी बांधील असेल, तसे न केल्यास प्रशिक्षणार्थीचे नाव प्रशिक्षणातून कमी करण्याचा अधिकार प्रशिक्षण संस्थेला असेल व प्रशिक्षणा-दरम्यान झालेला खर्च प्रशिक्षणार्थीकडून वसूल करण्यात येईल.

५. प्रशिक्षण संस्थेमार्फत वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या परीक्षा, चाचण्या इत्यादींना पूर्ण तयारीनिशी उपस्थिती, प्रशिक्षणादरम्यान वर उल्लेखलेल्या प्रमाणे १००% उपस्थिती, प्रशिक्षण संस्थेचे नियम व शिस्तीचे पालन व अटी पूर्ण करणारे प्रशिक्षणार्थीच प्रमाणपत्र मिळण्यास पात्र असतील.

६. प्रशिक्षणाला प्रवेश घेताना प्रशिक्षणार्थीस त्याची मूळ कागदपत्रे व २

छायांकित प्रती महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमेन कॉर्पोरेशन लिमिटेड ( मेस्को ), पुणे कडे जमा कराव्या लागतील व प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र मिळेपर्यंत कागदपत्र महाराष्ट्र एक्स- सर्व्हिसमेन कॉर्पोरेशन लिमिटेड (मेस्को ), पुणे कडे राहतील.

७. प्रशिक्षणार्थींना एका वेळी सारथी मार्फ़त राबविण्यात येणाऱ्या एकाच कौशल्य विकास कार्यक्रमात एकदाच सहभागी होता येईल.

८. याव्यतिरिक्त प्रशिक्षणासाठी निवड झाल्यानंतर सारथी आणि महाराष्ट्र एक्स-सर्व्हिसमेन कॉर्पोरेशन लिमिटेड (मेस्को), पुणे यांनी ठरविलेल्या इतर अटी व नियम यांचे पालन करणे आवश्यक राहील.

**अधिक माहितीकरिता प्रशिक्षण संस्थेचा संपर्क क्रमांक**

**महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित (मेस्को),**

**महासैनिक ओद्योगीक इस्टेट, प्लॉट नं. टी-१५३/ १,**

**भोसरी , पुणे ४११०२६**

**श्री. पराग - ८२०८५९६५५९**

## कौशल्य विकास कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रगतीचा मार्ग

| | |
|---|---|
| **Last Date and Time for Online Application** | **27 / 10 / 2019 by 5 PM** |